## रे.दि.मु. नं.६९/२०२१ मधील निशाणी क्र.७० खालील आदेश

प्रस्तूतचा अर्ज वादी यांचेतर्फे प्रतिवादी क्र.११ ते १२ यांचेविरुध्द दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १, २ अन्वये तूर्तातूर्त ताकिदीसाठी दाखल केला आहे.

### वादीचे अर्जातील हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे–

२. मौजे मंगरुळ, ता.खानापूर, जि.सांगली येथील शेत जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

| जमीन | क्षेत्र | आकार | हिस्सा |
|---|---|---|---|
| गट क्र. | हे-आर | रु-पैसे | |
| ५५३ | १-३९ | १-५० | हे.१-०२.८० आर, विहीरपड. |
| | पो.ख.०-०३ | | |

येणेप्रमाणे जमीन मिळकत झाडझुड, तालबांधोरा, विहिर, विहिर बोअर पाणी पाळीप्रमाणे घेणेचे हक्कासह व इतर सर्व हक्कासह वगैरे. (यापुढे वादग्रस्त जमीन असे संबोधण्यात येईल.)

३. दावा कलम १ मध्ये वर्णन केलेल्या वाद मिळकती या मुळच्या वादी क्र.१ चे आजोबा व वादी क्र.२ चे सासरे बापू यांचे होते. बापू यांना अनुसया व राहिबाई या दोन बायका आहेत. बापू यांना अनुसया हिचेपासून विठाबाई, प्रभावती, सुभद्रा, द्रोपदा या मुलीच असलेने राहिबाईशी अनुसया हिचे संमत्तीने विवाह केलेला होता. राहिबाई हिचेपासून भरत हा मुलगा व आक्कताई ही मुलगी झाली आहे. बापू हे दि.०७.१२.१९९८ रोजी मयत झाले आहेत. बापू मयत झाले त्यावेळेस बापूच्या मुली व पत्नी यांनी भरत हा पुढे बापूचा वारसा

चालविणार असलेने त्यास दावा कलम १ मध्ये नमूद केलेले मिळकतीतील त्यांचा हिस्सा सोडून दिलेला होता व तसे बापू मयत झाले तेव्हा सांगितलेले होते. पुढे वादी क्र.१ चे वडील व वादी क्र.२ चे पती भरत दि.२७.०९.२००२ रोजी मयत झाले. भरत मयत झाले नंतर दावा मिळकतीस बापूचे सर्व वारसांच्या नोंदी झाल्या आहेत.

४. पुढे वादी यांचे असे कथन आहे की, दावा मिळकतीस जरी बापूचे सर्व वारसांच्या नोंदी झालया असल्या तरी ही संपूर्ण दावा मिळकतीत बापूचे मृत्यूनंतर बापूचा मुलगा भरत यांची एकटयाचीच कब्जे वहिवाट आहे. तसेच भरत हाच संपूर्ण दावा मिळकतीची मेहनत मशागत करुन उत्पन्न घेत आलेला आहे. पुढे भरत मयत झालेवर वादींचीच प्रत्यक्ष कब्जे वहिवाट आहे. दावा कलम १ या मिळकतीत बापूचे इतर वारसांचा कधीही कब्जा अगर वहिवाट नाही. परंतू, बापूचे मृत्यूनंतर बापूचे सर्व वारसांची दावा मिळकतीस वारस नोंद झाली आहे. दावा कलम १ मध्ये नमूद केलेले संपूर्ण मिळकतीत वादींचाच प्रत्यक्ष कब्जा व वहिवाट आहे. बापूचे वारस प्रतिवादी क्र.४ ते १० हे कधीही मंगरुळ गावी नसून ते वेगवेगळया ठिकाणी असतात. त्यामुळे त्यांचा दावा मिळकतीत कधीही कब्जा अगर वहिवाट नव्हती व नाही. परंतू, दावा मिळकतीस प्रतिवादी क्र.४ विठाबाई चे नावाची नोंद असलेलेचा गैरफायदा घेऊन अशा दावा मिळकतीस असलेले नोंदीचे आधारे दावा/अर्ज कलम १ मधील मिळकतीची प्रतिवादी क्र.११ वृषभ यास खरेदी दिली असून प्रतिवादी क्र.११ वृषभ शरद ताटे ने प्रतिवादी क्र.१२ अनिता आप्पासो शिंदे यांस खरेदी दिली आहे. प्रतिवादी क्र.४ आणि ११,१२ यांचेत झालेली खरेदीपत्रे ही कागदोपत्री असून अशा लेखाने प्रतिवादी क्र.१ अगर प्रतिवादी क्र.१२ ला मिळकतीचा कब्जा मिळालेला नाही. दावा मिळकतीत

प्रतिवादी क्र.११, १२ हे खरेदीदार असलेने त्यांनी दावा मिळकतीचे वाटप करुन घेऊन त्यांचा असणारा हिस्सा त्यांनी पृथक व अलग करुन घेतले शिवाय वादीचे बरोबर दावा मिळकतीत वहिवाट करता येत नव्हती व नाही. परंतू, प्रतिवादी क्र.११, १२ हे गैरहक्की मनुष्यबळाचे जोरावर दांडगाव्याने कब्जे केलेशिवाय व वादींना हुसकावून लावले शिवाय राहणार नाहीत. अशा प्रतिवादी क्र.११ व १२ चे गैरहक्की हरकतीमुळे वादींना दावा मिळकतीस मुकावे लागून नुकसान होणार आहे.

५. पुढे वादी यांचे असे कथन आहे की, सदरहू दाव्याचा अंतिम निर्णय होईपावेतो वादीचे दावा/अर्ज कलम १ मधील गट क्र.५५३ या मिळकतीतील शांततामय कब्जे वहिवाटीस प्रतिवादी क्र.११ व १२ यांनी स्वत: अगर हस्तक, नोकर, एजंट, नातेवाईक यांनी हरकत अथवा अडथळा करुन वादींना दावा मिळकतीतून हुसकावून लावू नये व दावा मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारची खरेदी विक्री सारखे व्यवहार करुन नयेत व दावा मिळकतीवर थर्ड पार्टी इंटरेस्ट निर्माण करुन बोजा निर्माण करुन नये अगर खरेदी, गहाण, दान, बक्षिस यासारखे लेख करुन बोजा निर्माण करु नयेत म्हणून प्रतिवादी क्र.११,१२ यांना तुर्तातूर्त ताकीद देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

६. सदरच्या कथनाला पुष्टी देण्याकरीता वादीने फे.नि.क्र.८८ अन्वये अभिलेखावर खालील मा.उच्च व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णय भिस्त ठेवली आहे.

**१. *२००९(६) ऑल एम.आर ९८३, मा.सर्वोच्च न्यायालय, सिव्हील अपील क्र. १२९२-१२९३/२००२, गजरा विष्णू गोसावी वि. प्रकाश नानासाहेब***

*कांबळे वगैरे.*

*२. २०२४ आय.एन.एस.सी ६७६, मा, सर्वोच्च न्यायालय, सिव्हील अपील क्र. ४१७७/२०२४, एस.क.गोलम लालचंद वि. नंदू लाल शॉ वगैरे.*

*३. १९९८(१) सी.सी.सी ४०१ (बॉम्बे), मा.उच्च न्यायालय, बॉम्बे, बजरंग उर्फ हणुमंत तात्याबा काकडे वगैरे वि. श्रीमती. बाबुबाई वगैरे.*

*४. मा.सर्वोच्च न्यायालय, सिव्हील अपील क्र.५१८२/१९९३, आर.के. मोहंमद उबैदुल्लाह वि. हाजी सी. अब्दुल वहाब.*

*५. मा.सर्वोच्च न्यायालय, सिव्हील अपील क्र.१५९/२०२५, कृष्णा चंद्रा बेहेरा वगैरे वि. नारायण नायक वगैरे.*

*६. मा.सर्वोच्च न्यायालय, सिव्हील अपील क्र.३७२५-३७२६/२०१५, एच.लक्षमेह रेड्डी वगैरे वि.वेंकटेश रेड्डी.*

*७. मा.सर्वोच्च न्यायालय, सिव्हील अपील क्र.३१४१/१९९९, बिना मुरलीधर हेमदेव वि. कन्हैयालाल लोकराम हेमदेव वगैरे.*

प्रतिवादी क्र.११ तर्फे वादीच्या तुर्तातुर्त ताकीद अर्जास अभिलेखावर म्हणणे दाखल नाही.

**प्रतिवादी क्र.१२ तर्फे नि.क्र.८० वर वादीचे तूर्तातूर्त ताकीद अर्जास म्हणणे थोडक्यात खालीलप्रमाणे-**

७. वादीचा दावा , दाव्यासोबतचे शपथपत्र, तूर्तातूर्त ताकीद अर्ज व शपथपत्र व त्यातील संपूर्ण मजकूर साफ खोटा व लबाडीचा असून तो या प्रतिवादीस मान्य नाही. वादींचे दावा कलम १ मधील मिळकतीचे वर्णन थोडयाफार फरकाने बरोबर आहे. परंतू, वादींनी जाणीवपूर्वक दावा मिळकतीच्या चतु:सिमा दिल्या नसलेने वादींचा अपुऱ्या वर्णनावर आधारित दावा चालणेस पात्र

नाही. वादींनी दावा कलम ९ मध्ये केलेली आकारणी चुकीची असून वादींनी योग्य ती आकारणी केलेखेरीज वादींचा दावा कायदयाने चालू शकत नाही. वादींचे कथनाप्रमाणे अर्ज कलम ३ मधील मजकूर मधील वादींची संपूर्ण दावा मिळकतीत प्रत्यक्ष कब्जे वहिवाट कधीही नव्हती व नाही. दावा मिळकतीत बापूचे वारस म्हणजेच प्रतिवादी क्र.४ ते १० यांचा कायदेशीर हक्क, अधिकार तसेच कब्जे वहिवाट आहे. वादींनी त्यांचे दाव्यामध्ये व तुर्तातुर्त ताकीद अर्जामध्ये दावा मिळकतीस बापूचे सर्व वारसांची नोंद झालेचे कबूल केले आहे. यावरुन दावा मिळकतीत बापूचे वारसांचा हक्क, अधिकार व कब्जा कायदयाने होता ही बाब वादींना नाकारता येणार नाही.

८. पुढे प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, वादी यांना दावा मिळकतीस बापूचे पश्चात प्रतिवादी क्र.४ ते १० यांच्या असणाऱ्या नोंदी मान्य असलेने दावा मिळकतीत बापूचे वारसांचा कायदेशीर हक्क, हितसंबंध होता ही बाब वादींना नाकारता येणार नाही. वादींनी ताकीद अर्जामध्ये प्रतिवादी क्र.४ हिने प्रतिवादी क्र.११ यास मिळकत कधी खरेदी दिली याचा उल्लेख जाणीवपूर्वक टाळलेला आहे ही वादींची शुध्द लबाडी आहे. प्रतिवादी क्र.४ व ११ यांचेमधील व्यवहाराची वादींना पूर्वीपासून जाणीव व माहिती असताना वादींनी जाणीवपूर्वक केवळ प्रतिवादी क्र.१२ यांना त्रास देणेचे हेतूने सदर दाव्याची व तुर्तातूर्त ताकीद अर्जाची उभारणी खोटेपणाने केलेली आहे.

९. पुढे प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र.४ विठाबाई रघुनाथ राऊत ही कै.बापू यांची प्रथम पत्नी कै.अनुसया हिचेपासून झालेली मुलगी व कै.बापू यांची वर्ग १ मधील वारस आहे. कै.बापू यांचे पश्चात दावा मिळकतीत त्यांच्या पहिल्या पत्नीच्या चार मुलींचा व दुसरी पत्नी

राहिबाई व तिचेपासून झालेला एक मुलगा व एक मुलगी यांचा समान हक्क, अधिकार आहे. त्यानुसार कै.बापू यांची मुलगी म्हणजेच प्रतिवादी क्र.४ विठाबाई रघुनाथ राऊत हिने गट क्र.५५३ या गटातील तिचा समाईकात निर्माण होणारा संपूर्ण हिस्सा तिचे कायदेशीर गरजेकरीता प्रतिवादी क्र.११ यास दि.११.११.२०२१ रोजी र.द.अ.नं.३४०८/२०२१ या नोंदणीकृत खुषखरेदीपत्राने रितसर खरेदी दिलेला आहे. त्यानुसार प्रतिवादी क्र.११ याची गट क्र.५५३ या गटात वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ व ५ ते १० यांचेबरोबर समाईकात कब्जे वहिवाट आहे. प्रतिवादी क्र.४ हिने प्रतिवादी क्र.११ यास करुन दिलेल्या लेखाची नोंद ७/१२ पत्रकी रितसर झालेली आहे.

१०. पुढे प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.११ याने गट नं.५५३ मधील त्याचे खरेदी मालकीचा समाईकातील अविभक्त संपूर्ण हिस्सा त्याचे कायदेशीर गरजेकरिता विक्रीस काढला असता प्रतिवादी क्र.१२ यांना सोयीची असलेने त्यांनी दि.२७/०२/२०२३ रोजी र.द.अ.नं.८४३/२०२३ या नोंदणीकृत खुषखरेदीपत्राने रितसर खरेदी केलेली आहे. प्रतिवादी क्र.१२ या गट नं.५५३ या मिळकतीच्या बोनाफाईड परचेसर विथ व्हॅल्यू विदाऊट नोटीस अशा खरेदीदार आहेत. प्रतिवादी क्र.१२ यांची दावा मिळकतीत खरेदीपत्राचे तारखेपासून वादी व अन्य प्रतिवादी यांना समजून समाईकात कब्जे वहिवाट आहे. प्रतिवादी क्र.१२ यांचे खरेदीपत्र हे रितसर नोंदणीकृत असून अशा खरेदीपत्राची नोंद ७/१२ पत्रकी रितसर फे.नं. ३७५४ ने झालेली आहे.

११. पुढे प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, त्यानंतर यातील प्रतिवादी क्र.९ राहीबाई बापू काळसेन हिने गट नं.५५३ या गटामधील तिचा समाईकातील अविभक्त संपूर्ण हिस्सा प्रतिवादी क्र.१० हिचा मुलगा आकाश तातोबा भंडारे यास

दि.१३/१०/२०२३ रोजी र.द.अ.नं.४१०१/२०२३ या नोंदणीकृत बक्षीसपत्राने बक्षीस दिलेला आहे. सदर बक्षीसपत्रास प्रतिवादी क्र.९ यांची मुलगी प्र.वादी नं.१० हिने रितसर मान्यता दिलेली होती व आहे. त्यानुसार आकाश तातोबा भंडारे याची दावा मिळकतीत बक्षीसपत्राने तारखेपासून समाईकात कब्जे वहिवाट होती. आकाश तातोबा भंडारे याचे नावाची नोंद नोंदणीकृत बक्षीसपत्रानुसार फे.नं.३८४८ ने रितसर झालेली आहे. पुढे आकाश तातोबा भंडारे याने गट नं.५५३ मधील त्याचा समाईकातील अविभक्त संपूर्ण हिस्सा त्याचे कायदेशीर गरजेकरिता विक्रीस काढला असता सदरची मिळकत प्रतिवादी क्र.१२ यांना सोयीची असलेने त्यांनी दि.७/११/२०२४ रोजी र.द.अ.नं.४४२१/२०२१ या नोंदणीकृत खुषखरेदीपत्राने रितसर खरेदी केलेली आहे. प्रतिवादी क्र.१२ या गट क्र.५५३ या मिळकतीच्या बोनाफाईड परचेसर विथ व्हॅल्यू विदाऊट नोटीस अशा खरेदीदार आहेत.

१२. पुढे प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१२ यांची दावा मिळकतीत खरेदीपत्राचे तारखेपासून वादी व अन्य प्रतिवादी यांना समजून, उमजून समाईकात कब्जे वहिवाट होती व आहे. प्रतिवादी क्र.१२ यांचे खरेदीपत्र हे रितसर नोंदणीकृत असून अशा खरेदीपत्राची नोंद ७/१२ पत्रकी रितसर फे.क्र.३९३७ ने झालेली आहे. वादींना प्रतिवादी क्र.१२ यांचेबरोबर प्रतिवादी क्र.११ व आकाश तातोबा भंडारे यांनी केलेल्या व्यवहाराची पूर्ण जाणीव व माहिती आहे. तसेच प्रतिवादी क्र.११ व आकाश तातोबा भंडारे यांनी प्रतिवादी क्र.४ व प्रतिवादी क्र.९,१० यांचेशी केलेल्या व्यवहाराची देखील वादींना पूर्ण जाणीव व माहिती आहे.

१३. पुढे प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१२ यांची

दावा मिळकतीत दि.२७/०२/२०२३ व ०७/११/२०२४ रोजीच्या दोन खरेदीपत्राच्या तारखेपासून वादी व अन्य प्रतिवादी यांना समजून, उमजून प्रत्यक्ष कब्जे वहिवाट आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१२ यांनी वादींना मनुष्यबळाचे जोरावर दांडगाव्याने कब्जा करणेचा अगर हुसकावून लावणेचा प्रश्नच निर्माण होत नाही. प्रतिवादी क्र.१२ यांनी वादींचे कब्जे वहिवाटीस हरकत, अडथळा कधीही केला नसलेने वादींनी प्रतिवादींविरुध्द केलेली ताकिदीची मागणी ही चुकीची व निरर्थक आहे. प्रतिवादी क्र.१२ यांचे खरेदीपत्र हे रितसर नोंदणीकृत असलेने सदरचे खरेदीपत्र वादींवर कायदयाने बंधनकारक आहे. प्रतिवादी क्र.१२ या दावा मिळकतीतील समाईक व सहहिस्सेदार असलेने वादींना कायदयाने सहहिस्सेदाराविरुध्द ताकीद मागता येणार नाही. तसेच प्रतिवादी क्र.१२ यांनी खरेदी केलेल्या क्षेत्राशी वादींचा कोणताही हक्क व हितसंबंध नसलेने वादींचे मागणीप्रमाणे ताकीद देता येणार नाही. प्रतिवादी क्र.१२ यांनी दावा मिळकत खरेदी करणेसाठी बरीच मोठी रक्कम गुंतविली असून त्यामध्ये बरेच सोयी, सुधारणा केलेल्या आहेत. प्रतिवादी क्र.१२ यांचेविरुध्द ताकीद दिली गेलेस त्या आधारे वादी हे प्रतिवादी यांना हुसकावून लावणेची शक्यता आहे. त्यामुळे प्रतिवादी यांचे नुकसान होणार आहे. सबब, उपरोक्त कारणास्तव वादीचा तूर्तातूर्त ताकीद अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

सदरच्या कथनाला पुष्टी देण्याकरीता प्रतिवादी क्र.१२ यांनी अभिलेखावर खालील मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयावर भिस्त ठेवली आहे.

१. ***ए.आय.आर २००९ दिल्ली १८, मा. उच्च न्यायालय दिल्ली- दवेंदर लाल मेहता वि.धरमेंदर मेहता वगैरे, दि.१४.०५.२००९.***

*२. ए.आय.आर १९९६ बॉम्बे ३६, प्रकाश एस. अकोटकर वगैरे वि. मनसुरखा गुलाबखा वगैरे, दि.२६.०७.१९९५.*

*३. (२०००) १२६ पी.एल.आर ४१६, बचन सिंग वि. स्वरण सिंग, दि.०६.०३.२०००.*

*४. ए.आय.आर २०१९, मा. सर्वोच्च न्यायालय १७७७, टी. रामलिंगेस्वरा राव(मयत) तर्फे वारस वि. एन.माधवा राव, दि.०५.०४.२०१९*

*५. मा.सर्वोच्च न्यायालय, पी. सत्यनारायण वि. नंदयाला रामा कृष्णा रेड्डी, दि.१६.१२.२०२१.*

१४. वादी यांचेतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.एस.एस.जाधव यांचा युक्तीवाद ऐकला व प्रतिवादी क्र.१२ यांचेतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.एस.बी.पिंगळे यांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिपक्षाच्या परस्पर विरोधी कथनांवरून माझेसमोर खालील मुद्दे उपस्थित झालेले आहेत. त्यावरील निष्कर्ष मी कारणांसह पुढील प्रमाणे देत आहे;

| क्र. | मुद्दे | उत्तर |
|---|---|---|
| १. | वादी यांनी त्यांचे बाजूने प्रथमदर्शनी केस असल्याचे सिध्द केले आहे काय ? | नकारार्थी |
| २. | न्यायाचा समतोल वादीचे बाजूने झुकत आहे काय ? | नकारार्थी |
| ३. | तूर्तातूर्त ताकीद आदेश न दिल्यास वादी यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे काय ? | नकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**वादीतर्फे नि.क्र.३ अन्वये दस्तऐवजांची यादी**

१. मौजे. मंगरुळ, ता.खानापूर, जि.सांगली येथील गट नं. ५५३, ५५१, ५५४ च्या ७/१२ उताऱ्यांची दि.१०.०२.२०२१ रोजीची पडताळणी केलेल्या प्रती.

२. बापू विठू काळसेन यांच्या दि.०७.१२.१९९८ रोजीचा मृत्यूच्या दाखल्याची पडताळणी प्रत

३. भरत बापू काळसेन यांच्या दि.२७.०८.२००२ रोजीचा मृत्यूच्या दाखल्याची पडताळणी प्रत

४. वादीने गावकामगार तलाठी मंगरुळ यांना दिलेला दि.२८.१०.२०२० रोजीच्या तक्रार अर्जाची स्थळप्रत.

५. फे.नि.क्र.६९ अन्वये प्रतिवादी क्र.१२ यांचे पती व मुलगा याने वहिवाटीस हरकत अडथळा केला म्हणून दि.२१.०६.२०२५ रोजीची दिलेली तक्राराची मुळ प्रत.

६. मौजे मंगरुळ येथील दावा मिळकत मधील दस्त क्र.२४३/२०२३ मध्ये वृषभ ताटे यांनी अनिता शिंदे यांना विक्री केलेल्या दस्ताची दि.११.०७.२०२५ रोजीची सही शिक्क्याची नक्कल प्रत.

८. मौजे मंगरुळ येथील द्रौपदी दळवी यांनी वेदांत दळवी अ.पा.क आज्ञी प्रतिवादी क्र.३ द्रौपदी दळवी व वैशाली शिंदे यांना विक्री केलेला दस्त क्र.२१२२/२०२० ची दि.२१.११.२०२० रोजीची सही शिक्कयाची नक्कल प्रत.

९. प्रतिवादी क्र.४ विठाबाई शिंदे यांनी प्रतिवादी क्र.११ वृषभ ताटे यांना दावा मिळकतीमधील विक्री केलेला दस्त क्र.३४०८/२०२१ ची

दि.१६.०३.२०२२ रोजीची सही शिक्कयाची नक्कल प्रत.

१०. वादी क्र.१ यांचे वाद मिळकतीमधील फोटोंच्या मुळ प्रती.

११. मा.तहसिलदारसो यांचेकडील रस्ता केस क्र.१४/२०२१ मध्ये वादी यांना आलेली दि.१८.०८.२०२५ रोजीच्या नोटीसची झेरॉक्स प्रत.

**फे.नि.क्र.७९ अनव्ये प्रतिवादीतर्फे दस्तऐवजांची यादी–**

१. मौजे मंगरुळ, ता.खानापूर, जि.सांगली येथील गट क्र.५५३ चा ७/१२ उताऱ्याची दि.३१.०७.२०२५ रोजीची सही शिक्कयाची नक्कल प्रत.

२. मौजे मंगरुळ, ता.खानापूर, जि.सांगली येथील गट क्र.५५३ च्या मिळकतीच्या खरेदीचा फेरफार क्र.३९३७ व ३७५४ च्या दि.३१.०७.२०२५ रोजीची सही शिक्कयाची नक्कल प्रत.

३. मौजे मंगरुळ गट क्र.५५३ मधील मेहनत मशागत करतानाचे एकूण सहा फोटोंच्या दि.२९.०७.२०२५ रोजीच्या मुळ प्रती.

४. मौजे मंगरुळ गट क्र.५५३ च्या शेतजमीनीची मुळ सि.डी.

५. विक्रांत फोटो स्टुडिओचे अनिता आप्पासो शिंदे यांचे नावचे फोटोच्या बिलाची दि.२९.०७.२०२५ रोजीची मुळ प्रत.

६. राजेंद्र महादेव चोथे फोटोग्राफर यांचे दि.०१.०८.२०२५ रोजीचे अॅफिडेव्हीटची मुळ प्रत.

७. राजेंद्र महादेव चोथे यांचे फोटो व सीडी चे प्रमाणपत्राची दि.०१.०८.२०२५ रोजीची सही शिक्कयाची प्रत.

८. फे.नि.क्र.८४ अन्वये श्री.प्रकाश शिवाजी काळसेन आणि श्री.हणमंत विठोबा शिंदे यांच्या शपथपत्राची दि.०७.०८.२०२५ रोजीच्या मुळ प्रती.

## मुद्दा क्रमांक ०१ ते ०३ करिता:–

१५. मुद्दा क्र.१ ते ३ हे एकमेकांशी निगडित असल्याने कथनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्रीतरित्या विचारात घेण्यात येत आहेत.

१६. सर्व प्रथम हे नमूद करणे गरजेचे आहे की, तात्पुरत्या मनाई हुकुमाची दाद ही संपूर्णपणे न्यायसंगत आणि न्यायालयाचे विवेकावर आधारीत दाद आहे. सदरची दाद ही न्यायलयाने मंजूर करीत असताना न्याय, समानता (equity) आणि विवेक या तत्वांचा वापर करणे अपेक्षित आहे. सदरची दाद ही न्यायालयाचे न्यायिक विवेकावर आधारलेली असल्यामुळे अर्जदाराने हे प्रथम दर्शनी हे दाखविणे गरजेचे आहे की, त्याचा वाद जमीनीवर अधिकार आणि हितसंबंध आहे. त्याचबरोबर गैरअर्जदारचे कर्तव्य आहे की, त्याने अर्जदाराचे अधिकार आणि हितसंबंधांना बाधा पोहचवू नये. याव्यतिरीक्त अर्जदारने समानतेच्या तत्वाअन्वये (equity) दाद मागण्यासाठी न्यायालय समक्ष स्वच्छ हाताने समोर यायला पाहिजे.

१७. सदरहू अर्ज हा तूर्तातूर्त ताकिदीचा असलेमुळे केसचा गुणदोषावर विस्तृतपणे ऊहापोह करणे जरुरीचे नाही. तूर्तातूर्त ताकिदीचा अर्ज विचारात घेत असताना प्रथमदर्शनी केस व सोयीचा समतोल कोणाचे बाजूने आहे व अर्ज मंजूर केल्यास कोणाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होईल इतकी मर्यादित बाब विचारात घेणे जरुरीचे आहे.

१८. वादीचे जेष्ठ विधिज्ञ श्री.एस.एस.जाधव यांनी असा युक्तीवाद केला की,वाद मालमत्ता गट क्र.५५३ एकूण क्षेत्रफळ १ हे. ३९ आर ही मयत बापू काळसेन यांच्या मालकीची व वहिवाटीची होती. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मुली

म्हणजेच विठाबाई, प्रभावती, सुभद्रा, आक्काताई व भरत यांची नावे वारसाच्या नोंदी म्हणून झाल्या. परंतू, वादी क्र.१ चे वडील व वादी क्र.२ चे पती दि.२७.०९.२००२ रोजी मयत झाल्यानंतर संपूर्ण दावा मिळकती बापूचा मुलगा भरत याची एकटयाचीच कब्जे वहिवाट होती. बापू मयत झाले त्यावेळेस बापूच्या मुली व पत्नी भरत हा पुढे बापूचा वारसा चालविणार असल्याने त्यास त्यांनी दावा कलम १ मध्ये नमूद केलेली वादमिळकतीत त्यांच्या हिस्सा सोडून दिलेला होता व तसे बापू मयत झाले तेव्हा सांगितले होते. परंतू, वादीने सदरील कथनाच्या अनुषंगाने मयत बापूच्या मुली यांनी त्यांचा हिस्सा कधी, केव्हा व कोणत्या साली सोडून दिला या संदर्भाने कोणताही लेखी दस्त अभिलेखावर दाखल केलेला नाही.

१९. वादी पुढे असे कथन करतो की, दि.२७.०९.२००२ रोजी भरत मयत झाल्यानंतर दावा मिळकतीस बापूंच्या सर्व वारसांच्या नोंदी झाल्या. यावरुन असे दिसून येते की, वाद मालमत्तेमध्ये मयत बापू यांच्या पत्नी मयत अनुसया आणि राहिबाई यांच्या मुली आणि मुलगा निश्चितच वारस म्हणून महसूल दप्तरी नोंद झालेली आहे. वादीच्या मते प्रतिवादी क्र.४ विठाबाई हिच्या नावाची नोंद असलेचा गैरफायदा घेऊन दावा मिळकतीस असलेल्या नोंदीच्या आधारे अर्ज कलम १ मधील मिळकतीचे प्रतिवादी क्र.११ यास खरेदी दिलेली असून प्रतिवादी क्र.११ वृषभ ताटे यांनी प्रतिवादी क्र.१२ अनिता आप्पासो शिंदे यांना खरेदी दिलेली आहे. या अनुशंगाने अभिलेखावरील फे.नि.क्र.७५/१ वरील दि.२७.०२.२०२३ रोजीच्या खरेदी खताचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, लिहून घेणार अनिता शिंदे आणि लिहून देणार वृषभ ताटे यांनी १,१०,०००/- रुपयांत त्यांच्या समाईकात निर्माण होणारा हिस्सा कायम

खुषखरेदी दस्ताने दिला आहे. यावरुन प्रतिवादी क्र.१२ अनिता ही सदरील दस्तान्वये बोनाफाईड खरेदीदार व मालक असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

२०. प्रतिवादीच्या मते प्रतिवादी क्र.९ राहिबाई हिने प्रतिवादी क्र.१० अक्काताई हिचा मुलगा आकाश तातोबा भंडारे यास दि.१३.१०.२०२३ रोजी रजिस्टर दस्त अ.क्र.४१०१/२०२३ रोजी नोंदणीकृत बक्षीसपत्राआधारे वाद मिळकतीतील तिचा समाईक अविभक्त हिस्सा दिलेला आहे आणि यास प्रतिवादी क्र.१० ने रितसर मान्यता दिलेली आहे. त्यानंतर आकाश तातोबा भंडारे यांनी दि.०७.११.२०२४ रोजी रजिस्टर दस्त अ.क्र.४४२१/२०२१ या नोंदणीकृत खुषखरेदीपत्राने प्रतिवादी क्र.१२ यांना वाद मिळकत विकलेली आहे, परंतू सदरच्या कथनाच्या पुष्टर्थ प्रतिवादीने कोणताही दस्तऐवज अभिलेखावर दाखल केलेला नाही. प्रतिवादी पुढे असे कथन करते की, दि.२७.०२.२०२३ आणि दि.०७.११.२०२४ रोजीच्या खरेदीपत्राच्या तारखेपासून त्यांची प्रत्यक्ष कब्जे वहिवाट आहे. त्या अनुषंगाने प्रतिवादीने अभिलेखावर साक्षीदार प्रकाश शिवाजी काळसेन आणि साक्षीदार हणमंत विठोबा शिंदे या शेत शेजाऱ्यांचे शपथपत्र दाखल केले आहे. सदरील दोन्ही शपथपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दोन्ही साक्षीदार हे प्रतिवादी क्र.१२ अनिता आप्पासो शिंदे यांना ओळखत असून त्यांच्या कथनानुसार प्रतिवादी क्र.१२ ही सालोसाल पिके घेत असून शेती उपयोगी अवजारे ठेऊन वहिवाट करीत आहे. प्रतिवादी क्र.१२ ही खरेदीपासून वाद मालमत्तेमध्ये मेहनत, मशागत करुन त्यामध्ये पिके घेत आहे. सदरील दोन्ही साक्षीदारांनी प्रतिवादी क्र.१२ यांच्या कथनाला पुष्टी दिल्याचे दिसून येते.

२१. अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन वादग्रस्त मिळकती प्रतिवादी क्र.१२ अनिता आप्पासो शिंदे यांनी खरेदी केल्याचे व त्या बोनाफाईड

खरेदीदार असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे प्रतिवादी क्र.११ व १२ यांनी स्वता अगर हस्तक, नोकर, एजंट, नातेवाईक यांनी हरकत अथवा अडथळा करु नये असा आदेश मिळण्यास वादी पात्र नाही. तसेच वादी यांनी अभिलेखावर दाखल केलेले मा.उच्च न्यायालयाचे व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयांच्या प्रतींमधील वस्तुस्थिती भिन्न असल्याने ते सदर कामी लागू होत नाही.

२२. वादीने यांनी त्यांची केस सकृतदर्शनी असल्याचे, न्यायाचा समतोल त्यांच्या बाजूने असल्याने व हा अर्ज नामंजूर झाल्यास त्यांचे न भरुन येणारे नुकसान होईल याबाबी सिध्द केलेल्या नाहीत. म्हणून वादी यांनी वडीलोपार्जित वाद मिळकत दाव्याचा निकाल लागेपर्यंत प्रतिवादी क्र.११ व १२ वादग्रस्त शेतीत कधीही कसल्याही प्रकारे कोणामार्फतही अडीहरकती करु नये असा आदेश मिळण्यास पात्र नाही. सदरची वरील चर्चा ही या अर्जापुरतीच मर्यादीत राहिल. याचा पुढील खटल्यात कार्यवाहीमध्ये कुठलाही परीणाम होणार नाही. करीता मुद्दा क्र. ४ उत्तरार्थ खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे–

## आदेश

१. वादी यांचा निशाणी क्र.५ वरील तूर्तातूर्त ताकिदीचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. सदर अर्जाचा खर्च मुळ दाव्यात समाविष्ट करण्यात येतो.

VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE
Digitally signed by VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE
Date: 2025.12.10 17:04:19 +0530

विटा.
दिनांक ०१.१२.२०२५

(श्रीमती. व्ही.डी.शिरसे)
सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,विटा.
ता.खानापूर, जि.सांगली.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are same as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | G.U.Varude |
| Name of the Court | :- | Smt. V.D.Shirse<br>Jt.Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.<br>Vita. Tal:-Khanapur. |
| Date of decision | :- | 01.12.2025 |
| Order signed by P.O. on | :- | 09.12.2025 |
| Order uploaded on | :- | 10.12.2025 |